# राशिभविष्य - सप्टेंबर, २०१५.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व प्रगतिकारक होईलसे वाटते. महिन्याच्या पूर्वार्धात संततिसुखाच्या दृष्टीने तापदायक जाण्याची शक्यता दिसते. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे विचित्र आचरण, कोणाला आलेले नैराश्य अशापैकीकारणांनी त्रस्त व्हाल. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. कौटुंबिक स्थितीत गैरसमज, असमाधानकारक घटना, राहत्या जागेची समस्या अशापैकी कारणानी मनस्ताप होणे संभवते. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे फारसा मनस्ताप होणार नाही. उलट प्रेमसंबंधा त वाढ होण्याचीच शक्यता अधिक दिसते. शेतीवाडी असेल तर शुक्रामुळे काही मंडळीना त्यापासून भरपूर लाभ होईल. मित्रसुख मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना नोकरीत मनपसंत सुखसमाधान लाभेल. अन्य लाभ होणेही शक्य दिसते. नियोजित कार्यात प्र गती होईल व समाधान लाभेल. ज्यांचा परधमीयांशी व्यावसायिक संबंध असेल अशांना अशा संबंधामुळे विविध प्रकारचे लाभ होतीलसे दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी शत्रूराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे अपेक्षाभंग , असमाधानकारक घटना, मनस्ताप, अनारोग्य, अपघात अशा प्रकारच्या घटना घडू शकतील जपा. अपेक्षापूर्तीसाठी कर्जबाजारी होऊ नका. आर्थिक येणे असेल तर ते वसूल होण्यात विलंब होईल. कुमार्गी मित्रांपासून सावध राहा. सध्याच्या लहरी स्वभावावर नियंत्रण ठेवू शकलात फारसा मनस्ताप होणार नाही, असे वाटते. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व स्वस्थता लाभेल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि ग्रह पूर्णपणे व मंगळ ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. वाद, गैरसमज, असमाधानकारक घटना, नियोजित कार्यात येणारे अडथळे, होणारा विलंब अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील तर काहीना स्थावर समस्या त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात संततीविषयक समस्येला तोंड द्यावेलागेल. नोकरीत

वरिष्ठांच्या त्रासाची भर पडेलसे वाटते. जपा. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने काही मनोनुकुल घटनाही घडण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने काही भाग्यवंताना भूमिलाभ होईल तर काहीना धन, मान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होईलसे दिसते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्रीग्रहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना काळ लाभदायक होईल. पण या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी मात्र अकारण दगदग करू नये. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनी ग्रहामुळे जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करीलसे दिसते. तसेच कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. पण चांगल्या मित्रांशी भांडू नका. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना आर्थिक समस्या त्रस्त कारील्से दिसते. पण सर्वच स्वतंत्र व्यवसाय करत असणारांना अस्थिर परिस्थितीला तोंड द्यावे लागेलसे वाटते. सहनशील व्हा, मनावर ताबा ठेवा, व प्रतिकुल काळाशी मुकाबला करा. भगवान शंकराची उपासना करा.

**(३) मिथुन** - या राशीच्या मंडळीना नोकरी व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. तेव्हा जे काय साध्य करावयाचे ते पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल ठरण्याची दाट शक्यता दिसते. अनारोग्य, कौटुंबिक समस्या, गैरसमज अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखसमाधानात बाधा येणे संभवते. जपा. नियोजित कार्यात अडथळे, विलंब होण्याची शक्यता दिसते. तसेच बंधुसुखात बाधा येणेही संभवते. जपा. आर्थिक समस्या त्रस्त करतील. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या साहित्यिक मंडळीचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना वातपित्ताचा तर काहीना नेत्रविकाराचा त्रास होणे संभवते. जपा. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक व सुखकारक होईल. या राशीच्या युवक युवतीना हातचे सोडून नवे काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तसे काही करू नये. आहे ती नोकरी वा व्यवसायच करावा. नवे काही करण्यास काळ प्रतिकुल आहे. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शक्ती व सात्विक सुखसमाधान मिळू शकेल. तसेच काही मंडळीना प्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. मित्रसुख लाभेल. वैवाहिक सुख व संततिसुख लाभेल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व

शांती लाभेल.

**(४) कर्क** - सध्या या राशीच्या मंडळीचे मन व विचार चंचल, अस्थिर व स्वभाव थोडा हट्टी झाला असण्याची शक्यता दिसते. तसेच चैनीकडे मनाचा ओढा असेल तर त्यामुळे अकारण श्रम व दगदग सहन करावी लागत असेल. शिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करीत असावी, असे वाटते. पण अर्थप्राप्तीसाठी धडपड करीत असताना आर्थिक फसवणूक होणार नाही, याची काळजी घ्या. प्रिय जनांशी वाद, भांडणे टाळा. अकारण चिंता करू नका शारीरिक उष्णता भडकून डोळे, घसा, मान यापैकी कसला तरी आजार त्रस्त कारीलसे वाटते. नोकरी-व्यवसायात महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या कर्तृत्ववान मंडळीना नोकरीत बढती, मानाचे स्थान वा एखादेव उच्च पद असे काही मिळणेही संभवते. पण राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यताही दिसते. जपा. या राशीच्या पंचं स्थानी शत्रूराशीत असलेल्या शनीमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडथळे येण्याची शक्यता दिसते. तसेच मुलांपैकी कोणास निरुत्साह, कोणास आजारपण, कोणास कुसंगती, कोणाचे कसल्या तरी मोहात मन अडकल्याने अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष्अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळीच्या संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. शक्यतो बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाणे टाळा. विषभय संभवते. तसेच पाण्याशी संबंधित नोकरी असणारांनी विशेष जपावे कारण जलभय आहे. या राशीच्या काही मंडळीचे ढोंगी आचरण उघड झाल्यास जनमानसात असलेली त्यांची प्रतिमा मलीन होईल. जपा. मनापासून श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा.

**(५) सिंह** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. म्हणूनत्यांनी आपल्या संतापी, अहंकारी स्वभावाला मुरड घालावी, व सतत सहनशीलतेचे व नम्रतेचे आचरण करून काळ व्यतीत करावा, असे आग्रहा ने सांगावेसे वाटते. विचाराच्या तंद्रीत आणि खळबळजनक मनस्थितीत न राहता सतत सावधानतेने आचरण करावे. त्यामुळे सर्व प्रकारचे आरोग्य फारसेन बिघडता शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचे सुखसमाधान अनुभवू शकाल. अपघात भय असल्याने वाहने सावधानतेनेच चालवा, विचाराच्या तंद्रीत कोणतेही काम करू नका. नोकरी, व्यापार, व्यवसाय काहीही असो, जे जे घडेल ते सहन करूनच विपरीत काळ व्यतीत करा. रवि, मंगळ, शनि हे तीन

प्रतिकुल असल्याने व हर्षल-नेपच्यूनची त्यांना साथ असल्याने घरीदारी सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता दिसते. हृदयविकार, रक्तदाब अशी दुखणी असणारांनी तर मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. अविचाराचे आचरण आर्थिक चिंता निर्माण करील. जपा. शत्रुराशीतील शनिग्रहामुळे कारण असो वा नसो, कौटुंबिक सुख व गृहसौख्य यांत बाधा निर्माण होणे संभवते. जपा. जीवनसाथीशी समजूतदारपणे आचरण केल्यास व दोघांनी आपापले आरोग्य जपल्यास वैवाहिक जीवनातील सुखात फारशी बाधा येणार नाही. केवळ शास्त्रीय संशोधन व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होणे शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

(६) कन्या - या राशीची जी मंडळी आध्यात्मिक उपासना करतात, किंवा ज्यांना समाजकार्याची आवड आहे अशांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व सात्विक समाधान देणारा असाच सिद्ध होईल. तसेच या राशीच्या युवकयुवतीना अपेक्षित अशी उत्तम नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता आहे. प्रवासाचे योग येतील. रवि-मंगळ पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे अकारण खर्च , गैरसमजाने वाद, भांडणे यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर त्यांचाही पुन्हा त्रास सुरू होण्याची शक्यता दिसते. जपा. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. तसेच काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. जीवनसाथीच्या लहरी आणि विक्षिप्त आचरणामुळे, गैरसमजामुळे, मतभेदामुळे वैवाहिक जीवनातील सुख समाधान मिळणे अशक्य होईल. दोघांपैकी कोणी एकाने समजूतदारपणे आचरण केल्यास संबंध फारसे ताणले जाणार नाहीत. कोर्ट प्र करणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल तर काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या काही मंडळीना आपल्याला उगीचच काही आजार झाल्याची भावना होईल व त्यामुळे अकारण नैराश्य येणे संभवते. अशा प्रतिकुल परिस्थितीतही काही भाग्यवंतांना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना वात्विकाराचा तर काहींना फसवणूकीचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ पठण करा.

(७) तुळा - या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा

पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. रवि ग्रहासह गुरु ग्रहही या राशीच्या लाभस्थानी असल्याने इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. काहीना बढती, काहीना उच्च पद तर काहीना मानाचे स्थान प्राप्त होईल. काहींना धनलाभ होईल. काहींना वाहनसुख मिळेल. या राशीच्य ाविद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती करणे शक्य होईल. नवे मित्र मिळतील. या राशीच्या विवाहेच्छू युवक युवतीचे विवाह जुळून येतील. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होऊ शकेल. काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत बदल ह ाेणे संभवते. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्ताप, दु:ख , चिंता , सतत मान्विरुद्ध घटना घडण्याची शक्यता जाणवते. जपा. या राशीच्या धनस्थानी शत्रुर ाशीतीलशनि ग्रह असल्याने आर्थिक समस्या त्रस्त करतील. कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर त्य ांचात्रास होणे संभवते. या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तसे न करता आहे तो नोकरी-व्यवस ायचकरावा. काळ प्रतिकुल असल्याने नुकसान होण्याचीच शक्यता आहे. जपा. स्वतंत्र व्यवसाय करत असणारांनी महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक उलाढाल करू नये. मनावर ताबा ठेवून काळ व्यतीत करावा, हे उत्तम. अधिक विचाराने काहीना डोकेदुखीचा तर काहीना मेंदूविकाराचा त्रास ह ाेणे संभवते. जपा. नियमाने दररोज हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळीनी स्वत:च्या व जीवनसाथीच्या सर्व प्रकारच्या आरोग्यविषयक समस्यांची काळजी घ्यावी. दैनंदिन कार्यात व नियोजित कार्यात अडचणी , अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यामुळे अस्वस्थ वाटेल व काही मंडळीना गहरे नैराश्य येणेही संभवते. तसेच घरगुती परिस्थितीत गैरसमजाने वाद, भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच सिद्ध होईल. मोठ्या अधिकारी मंडळीच्या ओळखी होतील व त्यामुळे लाभदायक परिस्थिती निर्माण होईल. काहीना मानाचे स्थान तर काहीना उच्च पद मिळणेही संभवते. सर्व काही मनासारखे घडत असल्याचा अनुभव येईल व सुखसमाधान लाभेल. नवे मित्र मिळतील. या

राशीच्या ज्या मंडळीना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य आहे त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावा. तेच सुखाचे होईल. शास्त्रीय संशोधन, उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र , गूढ संशोधन अशा क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ यशदायक व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच विविध कारणांनी या राशीच्या मंडळीच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा. नियमितपणे स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या व्ययस्थानी शत्रुराशीतील शनि ग्रह आहे. त्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. म्हणून या राशीच्या मंडळीनी सतत मन व विचारशक्ती शांत ठेवूनच सर्व व्यवहार करावेत. विशेष करून सर्व आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक व सावधानतेने करावेत. काहीमंडळीची मानहानी होणे संभवते; तर काहीच्या मागे कोर्टप्रकरणे लागणे संभवते. जपा. त्यामुळे अनारोग्य होण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना बढती, काहीना मानाचे किंवा अधिकाराचे पद मिळण्याची शक्यता आहे. मान्यवरांच्या ओळखी होतील व त्यातून लाभदायक घटना घडतील. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाचे योग येतील; तर काहीना जलप्रवासाची संधी मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धात विरोधी परिस्थितीला सामोरे जावे लागेल. मानसिक ताण सहन करावा लागेल. वडील व्यक्तीचा विरोध सहन करावा लागेल. घरगुती परिस्थिती कशीही असो, तुमचे समाधान होणार नाही. कोणाशी पटणार नाही. वास्तुसुख मिळणार नाही. या काळात या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत भावनाशील होणार असल्याने त्यांनी आध्यात्मिक उपासना करावी. आपली जन्मराशी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाच्या स्वामित्वाची असल्याने श्रीदत्तात्रेय उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. जलभय, वीजभय असल्याने सावधानतेने सर्व कामे करावीत. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने काही लाभदायक घटना घडतील. श्रद्धेने दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या संपूर्ण महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. मनस्ताप, आर्थिक चिंता , अनारोग्य, संततिसमस्या

अशापैकी कारणानी अस्वस्थ व्हाल. केवळ शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र , उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र , कोळसा, लोखंड व्यापारी, यांनाच काही प्रमाणात काळ अनुकुल व लाभदायक होण्याची शक्यता दिसते. आर्थिक समस्या, आर्थिक घोटाळे शिवाय अपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण होणार याची चिंता त्रस्त करील. वैवाहिक जीवनातही दोघांतील मतभेद, वाद, कोणा एकाचे अनारोग्य अशापैकी समस्या त्रस्त करतील. अशा परिस्थितीत काही मंडळीना कुसंगतीचा दुष्परिणामही सहन करावा लागेल. जपा. राहूमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळण्यात अडथळे निर्माण होतील. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे शारीरिक, मानसिक अनारोग्य, मनस्ताप देणाऱ्या घटना, मुलांपैकी कोणाचे आजारपण अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल, असे वाटते. अशा प्रतिकुलकाळातही या राशीच्या ज्या मंडळीच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील त्यांना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर या राशीच्या मंडळीनी श्रीहनुमान उपासना करावी व दररोज नियमितपणे श्रीहनुमानचालीसा स्तोत्राचे पठण करावे.

(११) **कुंभ** - सध्या या राशीच्या मंडळीचे अत्यंत कोमल झाले असावे, असे वाटते. तसेच मानसिक संवेदनाही शीघ्र होत असल्या पाहिजेत. पण स्वभाव मात्र अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे अविचाराने खर्च होणे, विचित्र आचरण होणे असे काही घडत असावे, असे दिसते. शिवाय जिभेला हाड नसल्याने बोलणे फटकळ व अपमान करणारे होत असण्याची शक्यताही जाणवते. तसे घडत असेल तर सांगावेसे वाटते की सहनशील व्हा, मौन व्रत धारण करा, नम्रतेचे आचरण करा आणि प्रतिकुल काळाशी मुकाबला करा. तेच सुखाचे होईल. अनारोग्याला निमंत्रण दिल्यासारखे घडेल. रवि,मंगळ व शत्रुराशीतील शनि ग्रह प्रतिकुल आहेत. त्यामुळे घरीदारी सतत मनस्ताप देणाऱ्या घटनाच घडण्याची शक्यता दिसते. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या काही मंडळीना उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. तसेच काहीना पोटविकाराचा तर काहीना मूत्राशयविकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळीना रक्तविकाराचा त्रास होणेही संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन व विचारशक्ती शांत, स्थिर राखण्याचा प्रयत्न करावा. नोकरी-व्यवसाय कोणताही असो, फारसे मनासारखे घडेलसे वाटत नाही. केवळ यांत्रिकतांत्रिक नोकरी वा व्यवसाय असणारांना , औषधविक्रेत्यांना काळ अनुकुल होईलसे दिसते. या

राशीच्या नोकरदार मंडळीपैकी ज्यांना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असेल त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. मन:शांतीसाठी श्रद्धेने श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मडळीचा स्वभाव सध्या अतिशय चंचल, लहरी, अस्थिर असा झाला असावा, असे वाटते. मौजमजा करावी, ऐषारामात राहावे अशी वृत्ती उफाळून येत असावी, असे वाटते. या राशीच्यानोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईलसे दिसते. तसेच उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, औषधंविक्रेत्यांना , यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना , वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्याची समस्या त्रस्त करील. तसेच राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधानात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या व्यय स्थानी असलेला नेपच्यून चिंता व नैराश्य निर्माण करणाऱ्या घटना घडवील. पण गुप्त पोलीस खात्यास त्यांच्या कार्यात यश देण्यास अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शनि-मंगळ केंद्र योगामुळे उष्णताविकार बळावून ताप येणे, फोड येणे, रक्तविकार बळावणे, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. जपा. काही मंडळीना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल, काहीच्या घरात चोरी झाल्यामुळे आर्थिक नुकसान होणे संभवते. मुलांपैकी कोणाचे आजारपण तर कोणाची अन्य समस्या मनस्ताप देईलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी असणारे रवि-राहू-बुध विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करतील, असे वाटते. जपा. श्रद्धा असेल तर श्री गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

=====ooooo0ooooo=====